दैनिक महावृत्त

Page 1
19 Aug 2025

# फिशिंगपासून पासवर्डपर्यंत – विद्याविकास माध्यमिक विद्यालयात सायबर सुरक्षा मार्गदर्शन



लातूर/प्रतिनिधी: आजच्या डिजिटल युगात इंटरनेटचा वापर झपाट्याने वाढत आहे. मोबाईल, संगणक व सोशल मीडिया या माध्यमांमुळे शिक्षणासोबतच दैनंदिन जीवन सुलभ झाले असले तरी त्याचबरोबर सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना डिजिटल जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये सुरक्षित इंटरनेट वापराची सवय निर्माण करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत विद्याविकास माध्यमिक विद्यालय, लातूर येथे सायबर सुरक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत 'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंवर सोप्या आणि उदाहरणासहित मार्गदर्शन केले. सोशल मीडियाचा सुरक्षित वापर कसा करावा, अनोळखी लिंक किंवा फिशिंग मेसेज ओळखण्याचे तंत्र, मजबूत व सुरक्षित पासवर्ड तयार करण्याची पद्धत, ऑनलाइन बँकिंग व डिजिटल पेमेंट करताना घ्यावयाची काळजी, तसेच इंटरनेटवर होणाऱ्या विविध फसवणुकींपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. याशिवाय, सायबर गुन्हा घडल्यास विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता तात्काळ तक्रार नोंदवावी यावर विशेष भर देण्यात आला. यासाठी उपलब्ध असलेली हेल्पलाईन क्रमांक १९३० तसेच ऑनलाईन तक्रार पोर्टलचा वापर कसा करावा याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यशाळेस शाळेचे मुख्याध्यापक श्री. जितेंद्र कातपुरे, शिक्षकवृंद श्री. रविंद्र अपसिंगे, श्री. सत्यजित मुंडे, श्री. लालासाहेब शिंदे, श्री. जयराम शिंदे, श्री. गजानन चाटे, श्रीमती शारदा लटपटे, श्रीमती वर्षा केंद्रे व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारीची भावना जागृत झाली असून ते आता इंटरनेटचा अधिक सावध व सजगतेने वापर करतील, असा विश्वास उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केला. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक माहितीच नव्हे तर डिजिटल जगतात सुरक्षित आणि जबाबदार नागरिक म्हणून वागण्याची प्रेरणाही मिळाली.